**निर्मल भारत अभियानाच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्याबाह्य ग्रामपंचायती/गावातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

शासन परिपत्रक क्रमांक: ग्रापाधो १११२/ प्र. क्र.१६०/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. ४ ऑक्टोबर, २०१२

**वाचा** : १. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापायो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु ०७ .दि.१७/३/२०१०
२. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र ग्रापाधो १११२/ प्र. क्र.१५४/पापु-०७, दि.१४/९/२०१२

**प्रस्तावना:** संदर्भ क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असणे व योजनेकरीता अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्यापुर्वी गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची अमंलबजावणी वेगाने करता यावी यासाठी, गावांमधील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधीच्या तिनही हप्त्यांच्या अदायगीसाठी गाव / वाडी हागणदारी मुक्त असण्याची अट काही कालावधीसाठी शिथिल करण्यात आली होती. संदर्भ क्र.२ येथिल शासन निर्णयान्वये राज्यातील बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये यावर्षी अपु-या पावसामुळे निर्माण झालेली दुष्काळ सदृष्य स्थिती विचारात घेऊन संदर्भाधीन दि.१७/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरीत करण्यासाठी विहित करण्यात आलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट या दोन जिल्ह्यांसाठी दि.३१ मार्च,२०१३ पर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

सन २०१२-१३ पासून केंद्र शासन पुरस्कृत संपुर्ण स्वच्छता अभियानाचे निर्मल भारत अभियान असे नामकरण करण्यात आले आहे.निर्मल भारत अभियानाची अंमलबजावणी ही आता ग्रामपंचायतींना आधारभूत मानून करण्यात येणार आहे.त्यासाठी निर्मल भारत अभियानांतर्गत सर्व जिल्ह्यांमार्फत वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यामधील ग्रामपंचायतींच्या क्षेत्रातील प्रत्येक घरामध्ये वैयक्तीक/सामुदायीक शौचालयाची सुविधा उपलब्ध होऊन ते ग्रामपंचायत क्षेत्र १०० टक्के हागणदारी मुक्त होणे आवश्यक आहे. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये निर्मल भारत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी तयार करण्यात आलेल्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या ग्रामपंचायती/गावांना हागणदारीमुक्तीची अट अबाधित ठेवण्याची तर इतर ग्रामपंचायती/गावांमध्ये प्रगतीपथावर असलेल्या व प्रस्तावित असलेल्या नविन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट काही कालावधीपर्यंत शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:** केंद्र पुरस्कृत निर्मल भारत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१२-१३ च्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या ग्रामपंचायती/गावांना संदर्भाधिन दि.१७/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली हागणदारी मुक्तीची अट लागू राहील तर इतर ग्रामपंचायत/गावांमध्ये प्रगतीपथावर असलेल्या व प्रस्तावित असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी संदर्भाधिन दि.१७/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा

प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरीत करण्यासाठी विहित करण्यात आलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट दि.३१ मार्च,२०१३ पर्यंत शिथिल करण्यात येत आहे.

त्यानंतर प्रचलित धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट व अनुदान वितरणाची पध्दत कायम राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असू त्याचा संगणक सांकेतांक **२०१२१००४१२१५४८१८००** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(र.अं.खडसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व आज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निविड नस्ती,पापु-०७